मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील निळ्या पूररेषेतील बांधकामांवर हातोडा

**येत्या आठ दिवसात कार्यालयनिहाय सर्वेक्षण करून बांधकामे निष्कासित करण्यात येणार: सुरक्षा यंत्रणा पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येईल**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पात्रालगत असलेल्या निळ्या पुररेषेतील बांधकामांचे येत्या आठ दिवसात क्षेत्रीय कार्यालयनिहाय सर्वेक्षण करून बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत. महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या निष्कासनाच्या कारवाई दरम्यान आवश्यक असणारी सर्व सुरक्षा यंत्रणा पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात नदीलगतच्या भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. त्याअनुषंगाने जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी पवना, मुळा, इंद्रायणी नदीपात्रात शहरातील निळ्या पुररेषेमध्ये असणारी



### आवश्यक खबरदारीसह विविध उपाययोजना

» धरण क्षेत्रासह शहरी भागात होणारा पाऊस तसेच धरणांमधून होणाऱ्या विसर्गामुळे या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असते. त्यामुळे अनेकवेळा शहरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यादृष्टीने कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी आवश्यक खबरदारीसह विविध उपाययोजना करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय चिंचवड येथे नियोजन बैठक पार पडली. या बैठकीस पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पिंपरी चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, महापालिका उप आयुक्त मनोज लोणकर, पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे, पोलीस आयुक्त संदिप डोईफोडे तसेच संबंधित अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या धरण क्षेत्रासह शहरी भागात होणारा पाऊस तसेच धरणांमधून होणाऱ्या विसर्गामुळे या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असते. त्यामुळे अनेकवेळा शहरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यादृष्टीने कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी आवश्यक खबरदारीसह विविध उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

### निष्कासन कारवाई दरम्यान पुरवणार सुरक्षा

» पवना, मुळा, इंद्रायणी नद्यांना आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर नदीपात्रातील निळ्या पुररेषेतील सर्व बांधकामे निष्कासित करण्याचे नियोजन बैठकीत निश्चित करण्यात आले. महापालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या निष्कासनाच्या कारवाई दरम्यान आवश्यक असणारी सर्व सुरक्षा यंत्रणा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येईल.

# महापालिकेच्या रुग्णालयांत वर्षभरात 16 लाख रुग्णांवर उपचार

**महापालिकेच्या विविध रुग्णालयात वैद्यकीय सेवेची गुणवत्ता वाढली, विश्वासार्हतेत भर पडल्याने रुग्णांची संख्या वाढत असल्याची भावना**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विविध रुग्णालयात वैद्यकीय सेवा या दर्जेदार असल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिकेच्या रुग्णालय आणि दवाखान्यात वर्षभरात ओपीडीमध्ये १६ लाखांहून अधिक रुग्णांनी उपचार घेतले. तर ८९ हजारांहून अधिक गंभीर रुग्णांना भरती करून उपचार करण्यात आले. पालिका रुग्णालयात उपचार घेणाऱ्यांची संख्या गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत तब्बल पावणे नऊ लाखांनी वाढली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर वेगाने विकसित होत असून ३० लाखांहून




### आरोग्य वर्धिनी केंद्र, आपला दवाखाना सुरु

»महापालिकेच्या वतीने शहरात ८ ते १० हजार लोकसंख्या असलेला भाग, झोपडपट्टी, दाट मनुष्यवस्ती, चाळी, १ किलोमीटर अंतरावर महापालिका रुग्णालय, दवाखाना उपलब्ध नाही, अशा ठिकाणी आरोग्य वर्धिनी केंद्र, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू केले जात आहेत.

> महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात सर्व आजारांवर उपचार, शस्त्रक्रिया होत होत्या. मात्र, आता २०२१ मध्ये महापालिकेने चार मोठी रुग्णालये उभारून यामध्येही सर्व आजारांवर अत्याधुनिक यंत्रणेसह उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यामुळे पालिका रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच भविष्यात ६७ आरोग्य वर्धिनी केंद्र आणि ३३ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना उभारण्याचे नियोजन आहे. २०० बेडचे नवीन तालेरा रुग्णालय, मोशीच्या रुग्णालयाचे काम सुरू आहे. जुन्या तालेरा रुग्णालयात बर्न वॉर्ड सुरू करण्याचे नियोजन आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी.

अधिक लोकसंख्या वर पोहोचली आहे. एकीकडे महागाईच्या काळात वैद्यकीय सेवा, उपचार सर्वसामान्य रुग्णांच्या आवाक्याबाहेर जात आहेत.

# चिकुनगुनियाचा उद्रेक! आतापर्यंत तिघांचा मृत्यू

## डेंग्यू, झिका यासह अन्य कीटकांपासून प्रादुर्भाव होणाऱ्या रोगांना मागे टाकत चिकुनगुनियाचा नवा प्रकार पुण्यात झपाट्याने पसरत आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

डेंग्यू, झिका यासह अन्य कीटकांपासून प्रादुर्भाव होणाऱ्या रोगांना मागे टाकत चिकुनगुनियाचा नवा प्रकार पुण्यात झपाट्याने पसरत आहे. सध्याच्या पावसाळ्यात चिकुनगुनियाच्या रुग्णांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. या रोगाच्या वाढत्या प्रादुर्भावाचे साथ असे वर्णन करत वैद्यकीय तज्ज्ञांनी धोक्याचा इशारा दिला आहे. राज्यात १५ वर्षांपूर्वी थैमान घालतेल्या चिकुनगुनियाच्या साथीचा पुन्हा उद्रेक होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

या पावसाळ्यात अचानक चिकुनगुनियाचा वाढलेला प्रादुर्भाव आणि त्याच्या अधिक गुंतागुंतीच्या प्रकाराबद्दल विचारले असता, तज्ज्ञांनी सांगितले की, या रोगाच्या विषाणूमध्ये बदल घडून नवा विषाणू अधिक प्राणघातक बनला आहे. त्यामुळे मेंदूला संसर्ग होऊन सूज येण्याचा (एन्सेफलायटिस) गंभीर प्रकार घडत आहे. या गुंतागुंतीच्या चिकुनगुनियाच्या संक्रमणाबद्दल विचारले असता, तज्ज्ञांनी त्याचे श्रेय विषाणूच्या नवीन बदललेल्या, अधिक प्राणघातक प्रकाराला दिले. डॉक्टरांनी असे मत नोंदवले की, या प्रकारामुळे एन्सेफलायटिस, मल्टी-सिस्टम समस्या आणि हृदयाच्या स्नायूंना सूज येऊन छाती दुखणे-जळजळ, धाप लागणे, अनियमित हृदयक्रिया (मायोकार्डिटिस) आदी विकार होऊन रुग्णाच्या जिवाला धोका निर्माण होत आहे. शहरात गेल्या १५ दिवसांत चिकुनगुनियाचे तीन रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. मात्र, या रोगाच्या उद्रेकाची चिंताजनक स्थिती असतानाही पुणे महापालिकेने साथीवरील प्रतिबंधात्मक उपायांना फारसे महत्त्व दिलेले दिसत नाही. हे संकट एवढे तीव्र नसल्याचे महापालिकेला वाटत आहे. त्यामुळे चिकुनगुनियामुळे किती रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत, याचा अहवाल देण्यासही महापालिका अपयशी ठरली आहे.

### चिकुनगुनियाची आढळली नवी लक्षणे

» चिकुनगुनियाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे रुग्णालयांतील अतिदक्षता विभाग, रुग्ण कक्ष भरलेले आहेत. त्यांना पुरवण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा बोजवारा उडाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील वाकड आणि चाकणसारख्या भागांसह संपूर्ण पुण्यात ही साथ पसरली आहे. आबालवृद्धांत म्हणजेच सर्व वयोगटात या रोगाचा प्रादुर्भाव झालेला दिसत असल्याचे डॉ. गादिया यांनी सांगितले. ते म्हणाले की, सांधेदुखी आणि पुरळ ही चिकुनगुनियाची नेहमीची लक्षणे आहेत. चिकुनगुनियाच्या नव्या प्रकारात तीव्र सांधेदुखीसह पोटदुखी (गॅस्ट्रोएन्टेरिटिस), जुलाब आणि उलट्या ही नवीन लक्षणे दिसत आहेत. ही लक्षणे पूर्वी चिकुनगुनियाच्या रुग्णांत आढळत नव्हती. आळंदी, चऱ्होली, चाकण, वाघोली, मुंढवा, धनकवडी, सिंहगड रस्ता आणि रास्ता पेठ या भागांत या साथीचा मोठा प्रादुर्भाव झाल्याचे डॉ. गादिया यांनी सांगितले.

### चिकुनगुनियाचा मोठा प्रादुर्भाव!

» नोबल रुग्णालयातील संसर्गजन्य रोगतज्ज्ञ डॉ. अमित द्रविड यांनी सध्या पसरत चाललेल्या चिकुनगुनिया साथीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, सध्या चिकुनगुनियाचा नवा विषाणू प्रबळ ठरत आहे. त्यामुळे रुग्णांना रुग्णालयात उपचारांसाठी तातडीने दाखल करावे लागते. त्यांच्या तब्येतीत गुंतागुंत होते. सध्या रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागात डेंगी आणि झिकाचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांच्या तुलनेत चिकुनगुनियाचे रुग्ण सर्वाधिक आहेत.

### विषाणूमध्ये उत्परिवर्तन!

» डॉ. गादिया आणि डॉ. द्रविड या दोघांनीही चिकुनगुनियाची सध्याची साथ ज्या तीव्रतेने पसरत आहे, यामागे या विषाणूच्या प्रकारात उत्परिवर्तन हे महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले. या विषाणूत उत्परिवर्तन झाल्याचे दिसते, ज्यामुळे हा नवा विषाणूचा प्रकार अधिक आक्रमक आणि विध्वंसक झाला आहे. 'इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन'चे माजी अध्यक्ष आणि एमजेएम रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाचे संचालक डॉ. सुभाल दीक्षित यांनी डेंग्यू आणि अन्य रोगांच्या तुलनेत चिकुनगुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे मान्य केले. ते म्हणाले, आम्ही चिकुनगुनियाचा खूप मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादुर्भाव अनुभवत आहोत. सध्या या रुग्णांची संख्या खूप मोठी आहे.”

---

# पुणे बनतंय ड्रग्जची राजधानी? तब्बल 119 तरुणांच्या घरी कुरीअरने मेफेड्रॉन, 70 जणांचा पत्ता मिळाला

## तरुणाई अंमली पदार्थांच सेवन करण्यासाठी चक्क कुरीयरचा वापर करत असल्याची मोठी माहिती समोर आली आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याची ओळख आता ड्रग्जचे शहर म्हणून होताना दिसत आहे. ललित पाटील प्रकरणानंतर आणि पबमध्ये ड्रग्जचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले होते. तर शहरात अनेकदा मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज सापडत आहेत. तर तस्करीचे किती मोठे रॅकेट असेल, याचा अंदाज यावरून बांधला जाऊ शकतो. गेल्या काही दिवसांमध्ये पुण्यात मोठी ड्रग्ज रॅकेट्स (PUNE CRIME NEWS) समोर येत आहेत. काही दिवसांपुर्वी विश्रांतवाडी परिसरात एमडी ड्रग्जचा साठा पुणे पोलिसांकडून (PUNE CRIME NEWS) जप्त करण्यात आला आहे. या ड्रग्जचे बाजार मूल्य एक कोटीपेक्षा जास्त असल्याची माहिती आहे. साधारण अर्धा किलो एमडी डॅक्सचा साठा पोलिसांकडून जप्त करण्यात आला आहे. यादरम्यान तरुणाई अंमली पदार्थांच सेवन करण्यासाठी चक्क कुरीयरचा वापर करत असल्याची मोठी माहिती समोर आली आहे.

पुण्यातील तरुणाई अंमली पदार्थांच सेवन करण्यासाठी चक्क कुरीयरचा वापर करत असल्याचं समोर आलं आहे. पुण्यातील तब्बल 119 तरुणांनी कुरीयर कंपनीच्या मार्फत घरी मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ मागवल्याचं पोलीस तपासात स्पष्ट झालं आहे. पोलीसांनी आता या 119 जणांच्या पत्त्यांवर संपर्क करायला सुरुवात केली आहे. आतापर्यंत पोलीसांना 70 जणांचा पत्ता शोधण्यात यश आलं आहे. त्यानंतर पोलिसांकडून या तरुणांच्या पालकांना याची माहिती दिली जाणार असून समुपदेशनाला सुरुवात करण्यात येणार आहे

### पुण्यात तब्बल कोटीचं अमली पदार्थ जप्त

» विश्रांतवाडी परिसरात एमडी ड्रग्जचा साठा पुणे पोलिसांकडून जप्त करण्यात आला. या ड्रग्जचे बाजार मूल्य एक कोटीपेक्षा जास्त असल्याची माहिती आहे. साधारण अर्धा किलो एमडी डॅक्सचा साठा पोलिसांकडून जप्त करण्यात आला. पुण्यातील विश्रांतवाडी परिसरातून हे एक कोटीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी 3 तरुणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून एक कोटी रुपयाचे 471 ग्रॅम मेफेड्रोन हस्तगत करण्यात आले आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली.

### काय आहे नेमकं प्रकरण?

» पुण्यातील 119 तरुणांनी कुरीयर कंपनीच्या माध्यमातून मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ मागवल्याचं पोलीसांना आढळून आलं आहे. डार्क वेबच्या उपयोग करून ऑनलाईन ऑर्डर देऊन हे मेफेड्रॉन मागवण्यात येत होतं. मेफेड्रॉन मागवणाऱ्यांमध्ये 25 ते 40 वयोगटातील तरुणांचा सर्वाधिक समावेश आहे. मेफेड्रॉन मागवणाऱ्यांमध्ये काही विद्यार्थी तर काही नोकरदार आणि आयटीसेक्टरमध्ये काम करणारे असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

# पाऊस गेला अन् खड्डे बुजवण्याचा देखावाही

## स्थापत्य विभागाचे पथक गायब : रस्त्यांवरील खड्डे तसेच, वाहनचालकांची कसरत पुन्हा सुरुच

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील अनेक भागातील मुख्य व अंतर्गत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे तसेच काम राहिले आहे. पावसाने उघडीप दिल्यानंतर स्थापत्य विभागाचे पथक गायब झाले. आठ प्रभागात ३२ पथकांद्वारे एक दिवसच खड्डे बुजवण्यात आले. मात्र, अनेक अंतर्गत रस्त्यासह काही भागात रस्त्यावर खड्डे बुजवण्याचे काम प्रलंबित राहिले होते. त्यामुळे वाहनचालकांची कसरत सुरूच असून पावसाने उघडीप घेतल्यानंतर स्थापत्य विभागाचे खड्डे बुजवणारे कामगारही सुट्टीवर गेले आहेत का, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. त्यामुळे पालिकेने खड्डे बुजवण्याचा केवळ देखावा केला असल्याची चर्चा रंगली आहे.



पिंपरी-चिंचवड शहर परिसरात पावसामुळे अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली होती. शहरात रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहेत. मात्र, काही दिवस पावसाने उघडीप देऊनही महापालिका खड्डे बुजवत नसल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. महापालिकेच्या आठ क्षेत्रीय व स्थापत्य प्रकल्प विभागाला शहरातील विविध रस्त्यांवर तब्बल २९४६ खड्डे आढळून आले होते. त्यापैकी २३७८ बुजविले होते. त्यापैकी केवळ ५६८ खड्डे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अनेक भागात मुख्य व अंतर्गत रस्त्यावर आणखी खड्डे दिसून येत आहेत. यंदा जूनअखेर पावसाला सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून शहरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत २९४६ खड्डे आढळले होते.

त्यापैकी १६३९ खड्डे १३ जुलैपर्यंत आढळून आले होते. त्यानंतर २१ ऑगस्टअखेर १३०७ खड्डे आढळून आले आहेत. डांबर आणि कोल्ड मिक्स, खडी, पेव्हिंग ब्लॉक, सिमेंट काँक्रिट ते पूर्णतः बुजविले आहेत. शहरातील केवळ ५६८ खड्डे बुजविण्याचे बाकी आहे, असा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, शहरातील रस्त्यांवर सर्वत्र खड्डेच खड्डे दिसून येतात.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सांगवी पूरस्थिती पाहणी दौऱ्यानंतर महापालिकेने ३२ पथकाद्वारे एकाच दिवसात खड्डे बुजवण्यास सुरुवात केली. त्यानंतर हे पथक गायब झाले. रस्त्यावरचे खड्डे देखील बुजवण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### वाहनचालकांचा जीव मुठीत धरून प्रवास

**» खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे वाहनचालकाला खड्ड्यांचा अंदाज येत नाही. वाहन खड्ड्यात आदळून चालकाला तसेच वाहनाला दणका बसत आहे. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी दुचाकीचालकांना कसरत करावी लागत आहे. परिणामी, वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत आहे.**

“ पावसामुळे डांबरीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे मुरुम, खडी आणि सिमेंट-काँक्रिटने बुजवले जातात. पावसाळा संपल्यानंतर सर्व खड्डे पुन्हा नव्याने डांबराने भरण्यात येणार आहेत.

**- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# लैंगिक अत्याचाराच्या घटनांकडे पालिकेचे दुर्लक्ष

## शहरातील पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळांमध्ये सीसीटीव्हीकॅमेरे बसवणे बंधनकारक, मुलींच्या सुरक्षेसाठी 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील क्रिएटिव्ह शाळेत घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या दुर्घटनेनंतरही पालिकेचा शिक्षण विभाग झोपलेल्या स्थितीत आहे. शहरातील पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळांमध्ये तिसरा डोळा (सीसीटीव्ही) कॅमेरे बसवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय मुलींच्या सुरक्षेसाठी 'सखी सावित्री' समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील खासगी शाळा तर सोडाच पण महापालिकेच्या शाळांमध्येही अशी समिती स्थापन केली नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अनेक शाळांमधील सीसीटीव्ही यंत्रणा कुचकामी असून सध्या बंद अवस्थेत आहे. त्यामुळे शहरातील खासगीसह महापालिकेच्या शाळांमधील शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित झाला आहे.



बदलापूर येथे खासगी शाळेमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार झाला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांमधील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक १०५, तर माध्यमिक १८ शाळा आहेत. या शाळांमध्ये ५० हजार विद्यार्थी शिकत आहेत, तर पहिली ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सुमारे पाचशेहून अधिक खासगी शाळांमध्ये मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत आहे. त्या सर्व शाळांमधील 'सखी सावित्री' समिती कागदावरच असून सुरक्षेसाठी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे कुचकामी असल्याचे दिसून येत आहे.

### समितीच्या कामकाजाला मुहूर्तच नाही

शाळांमधला अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम यासाठी जसे काही नियम असतात, तसेच नियम विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही काही नियम करण्यात आले आहेत. शाळांमध्ये सखी सावित्री समिती स्थापन करण्यात यावी, अशी घोषणा मार्च २०२२ मध्ये करण्यात आली. 'राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी शासन स्तरावरून 'सखी सावित्री' समितीचे गठन करण्यात आले. राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी तसेच समतामूलक वातावरण निर्मितीसाठी शाळा व केंद्रस्तरावर सखी सावित्री समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुला-मुलींना घर, समाज, शाळेत सुरक्षित व बालस्नेही वातावरण मिळावे, त्यांचे सामाजिक, भावनिक अध्ययन चांगले व्हावे यासाठी ही समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### क्रिएटिव्ह नंतरही प्रशासन झोपलेलेच

**» शहरातील क्रिएटिव्ह शाळेत लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतरदेखील महापालिका शिक्षण प्रशासनातील अधिकारी अद्याप झोपलेले आहेत. मुलींच्या सुरक्षेसाठी, तसेच त्यांना येत असलेले वाईट अनुभव मोकळेपणाने सांगण्यासाठी सखी सावित्री समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, अनेक शाळेत ही समिती स्थापन केलेली नाही. बदलापूर येथील घटनेच्या उद्रेकानंतर महापालिकेच्या शिक्षण विभागाला जाग आली आहे. त्यानंतर शिक्षण विभागाने याबाबत माहिती घेण्यास सुरुवात केली. मात्र, अशी समिती स्थापन करण्याच्या आदेशाबाबत मुख्याध्यापक व शिक्षकांनाही माहिती नसल्याचे दिसून आले आहे.**

# पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागात खांदेपालट

## उपआरोग्य प्रमुखांच्या जबाबदाऱ्यात महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी केले बदल

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आरोग्य विभागात वर्षानुवर्षे एकच जबाबदारी सांभाळणाऱ्या सहाय्यक आरोग्य अधिकाऱ्यांच्या जबाबदारीत बदल करण्यात आले आहेत. काही अधिकाऱ्यांबद्दल पालिका आयुक्तांकडे थेट तक्रारी गेल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अधिकाऱ्यांच्या कामात बदल करत त्यांना नवीन जबाबदारी दिली आहे.



महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या अंतर्गत गटबाजीमुळे हा विभाग अनेकदा चर्चेत आला आहे. या विभागातील अधिकाऱ्यांकडे वर्षानुवर्षे केवळ ठराविक खात्यांचीच जबाबदारी असल्याने त्यांच्यामध्ये शीतयुद्ध वेगवेगळ्या माध्यमातून सुरूच असते.

महापालिकेच्या उपआरोग्य अधिकारी असलेल्या डॉ कल्पना बळीवंत यांच्याकडे जन्म मृत्यू, विवाह नोंदणी आणि स्मशानभूमी, दफनभूमी अद्यावतीकरणची जबाबदारी होती. ही जबाबदारी कमी करून त्यांना मेडिकल कॉलेज व्यवस्थापन, मेडिकल यूनिट आणि आरोग्य विभागाकडील सामान्य प्रशासन तसेच पीसीपीएनडीटी आणि एमटीपीची जबाबदारी देण्यात आली आहे. यापूर्वी पीसीपीएनडीटी आणि एमटीपीची जबाबदारी ही डॉ सूर्यकांत देवकर यांच्याकडे होती. तसेच १ ते ३ लाख पर्यंतची वैद्यकीय बिलांची देयके मान्य करण्याची देखील जबाबदारी देवकर यांना देण्यात आली आहे.

डॉ. मनीषा नाईक यांच्याकडे गेल्या काही वर्षांपासून असलेल्या शहरी गरीब योजना आणि अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेची जबाबदारी सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे यांच्याकडे देण्यात आली आहे. तसेच डॉ. वावरे यांच्याकडे औषध भांडार, महापालिका रुग्णालयाचे सुधारणा व आधुनिकीकरण, आरोग्य प्रकल्प, परिमंडळ १ सनियंत्रण व पर्यवेक्षण अधिकारी अशी जबाबदारी देखील देण्यात आली आहे. सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ सूर्यकांत देवकर यांच्याकडील सर्व जबाबदाऱ्या कमी करून त्यांना आता नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. डॉ देवकर यांच्याकडे जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट, नर्सिंग होम रजिस्ट्रेशन, विकेंद्रित परवाना विभाग, एड्स, परिमंडळ ३ च्या सनियंत्रणाची जबाबदारी देण्यात आली आहे.

डॉ वैशाली जाधव यांच्याकडे साथरोग नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा नियोजन समिती, (डीपीसी), महापौर निधी, एनसीडी, परिमंडळ ४ ची जबाबदारी देण्यात आली आहे. तर डॉ राजेश दिघे यांच्याकडे केवळ राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमची जबाबदारी होती. ती तशीच कायम ठेवत त्यांना कीटक प्रतिबंधक विभाग, सीएसआर, स्मशानभूमी, दफनभूमी संबंधित कामकाज, बोगस डॉक्टर शोध मोहीम, परिमंडळ ५ चे सनियंत्रण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

# ‘पीएमपीएमएल’च्या ‘ॲप’ ला मर्यादांचा ब्रेक!

## पीएमपीएमएलच्या ॲपला प्रवाशांचा अल्प प्रतिसाद : सेवेतही अडथळे असल्याच्या तक्रारी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) १७ ऑगस्टपासून प्रवाशांसाठी ‘ॲप्ली पीएमपीएमएल’ हे नवीन ‘मोबाईल ॲप्लिकेशन’ सुरू केले होते. ते आतापर्यंत जेमतेम ४० हजार जणांनीच कार्यान्वित (डाऊनलोड) करून घेतले आहे. मात्र, या ॲप्लिकेशनला अनेक मर्यादा असून, त्यामुळे तो प्रभावीपणे वापरता येत नसल्याच्या बहुसंख्य वापरकर्त्यांच्या तक्रारी आहेत.

हे ‘ॲप्लिकेशन’ एवढ्या प्रवाशांनी मोबाईलमध्ये कार्यान्वित करून घेतल्यानंतरही आतापर्यंत अवघ्या ६० हजार रुपयांचीच उलाढाल झाली आहे. त्यामुळे त्याच्या प्रभावी उपयोगितेविषयी प्रश्नचिन्हच निर्माण झाले आहे. ‘ॲप्ली पीएमपीएमएल’ सुरू करण्यामागे पुण्याच्या या सार्वजनिक वाहतूक सेवेत ऑनलाईन सुसूत्रता आणण्याचा उद्देश आहे. या ‘ॲप्लिकेशन’द्वारे एखाद्या वेळी प्रवाशाला हवी असलेली बस नेमकी कुठे आहे, याची थेट ताजी माहिती मिळण्यास मदत होईल, बसमार्गांची आणि बसक्रमांकांची माहिती प्रवाशांना मिळावी, ‘ऑनलाईन’ तिकिट नोंदणी, ‘यूपीआय’द्वारे तिकीट रक्कम भरणे, तक्रार नोंदवणे आदी सेवा याद्वारे होऊ शकतात. त्याचप्रमाणे ‘पुणे मेट्रो’ची तिकिटेही याद्वारे देण्याचा उद्देशही आहे.



मात्र, या ‘ॲप्लिकेशन’च्या उपयोगाविषयी प्रवाशांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या, तेव्हा हे ते अपेक्षेनुसार काम करत नसल्याच्या तक्रारी अनेकांनी केल्या. बस नेमकी कुठे आहे, याची अद्ययावत माहिती (लाईव्ह लोकेशन) या ‘ॲप्लिकेशन’द्वारे नेमकेपणाने मिळत नसल्याच्या तक्रारी अधिक प्रमाणात आहे. बसचे नेमके ठिकाण समजू शकत नसल्याने प्रवाशांना हे ‘ॲप्लिकेशन’ असूनही आपल्या प्रवासाचे नेमके नियोजन करण्यात अडचणी येत आहेत. ‘ऑनलाईन’ तिकिट नोंदणीबाबतही प्रवासी समाधानी नाहीत. ही नोंदणी करणे किचकट आणि सदोष पद्धतीने होते. त्यात अनेक चुका होत आहेत. त्यामुळे या ‘ॲप’द्वारे तिकीट नोंदणी व्यवहारात अनेक अडथळे,अडचणी येत असल्याने प्रवासी वैतागत आहेत.

या ‘ॲप्लिकेशन’चे वर्णन ते वापरण्यास सुलभ असेल असे केले गेले होते. मात्र, वापरकर्त्यांनी केलेल्या दाव्यानुसार हे ‘ॲप’ वापरण्यास सुलभ-सोपे नाही. विशेषतः त्याद्वारे ‘पुणे मेट्रो’ची तिकिटे खरेदी करण्यास अडचणी येत आहेत. तिकिट खरेदीतही अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने प्रवाशांना सहजपणे आणि विनाअडथळा तिकीट खरेदी करण्यात अडचणी येत आहेत.

आपल्या तक्रारींवर-समस्यांवर समाधानकारक तोडगा मिळण्यास विलंब येत असल्याने वापरकर्ते या ‘ॲप’च्या कार्यक्षमतेबद्दल असमाधानी आहेत. या ॲपला व्यापक प्रतिसाद मिळाल्यास त्याला समर्थपणे तोंड देण्यास याला मर्यादा येत आहेत. एक प्रवासी नेहा कदम यांनी सांगितले की, मला तर असे ‘ॲप’ सुरू झाले आहे, याचीच कल्पना नव्हती. प्रशासनाने या ‘ॲप’ची पुण्यात सर्वदूर जाहिरात केली पाहिजे. जेणेकरून अधिकाधिक प्रवासी ते ‘आपल्या मोबाईलमध्ये कार्यान्वित करू शकतील. बसच्या स्थितीविषयी अनेक प्रवासी नाराज असतात. जर हे ‘ॲप’ सुरू झाले आहे तर त्या माध्यमातून आम्ही नोंदवलेल्या तक्रारींवर समाधानकारक तोडगा पीएमपीएमल प्रशासन काढेल, अशी आशा आम्हाला वाटत आहे.

प्रकृती जैन या प्रवासी विद्यार्थिनीने सांगितले की, या ‘ॲप’द्वारे मेट्रो तिकिटेही खरेदी करता येतील, अशी जाहिरात हे ‘ॲप’ सुरू करण्यापूर्वी करण्यात आली होती. पण ही सेवा या ॲपवर सध्या तरी उपलब्ध नाही. हे ‘ॲप’ सर्व सेवा पुरवण्यात समर्थ झाल्यानंतरच सुरू करायला हवे होते. बसच्या दुरावस्थांकडे लक्ष देऊन त्यांची योग्य निगा राखण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली पाहिजेत. तसेच या व अन्य समस्यांसाठी या ‘ॲप’द्वारे नोंदवलेल्या तक्रारींना प्रशासनाने त्वरित कृतिशील प्रतिसाद देण्याची गरज आहे. ‘पीएमपीएमएल’ बसच्या नियमित प्रवासी शोभा कानिटकर यांनी सांगितले की, याची कल्पना चांगली आहे. मात्र, सध्या तरी त्याच्या वापरात अनेक तांत्रिक अडचणी येत आहेत. या ‘ॲप’द्वारे आपल्याला हव्या असलेल्या बसचा मागोवा नेमकेपणाने घेता येत नाही. त्यामुळे त्याच्या महत्त्वाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. तिकिट रकमेचा भरणा करण्याची प्रक्रिया फारच मंद गतीने होत आहे. तिचा वेग वाढवणे नितांत गरजेचे आहे. या मर्यादांवर मात केल्यास हे ‘ॲप’ प्रवाशांसाठी सुविधाजनक ठरेल.

‘पीएमपीएमएल’चे व्यवस्थापकीय सहसंचालक नितीन नार्वेकर यांनी या ‘ॲप’ ला प्रवाशांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचा दावा करून सांगितले की, आपल्याला हव्या असलेल्या बसच्या सेवा, त्यांचे वेळापत्रक, उपलब्धता आणि अन्य आवश्यक सेवा मिळवणे सोपे होणार आहे. आम्ही १३०० बसमध्ये मागोवा प्रणाली (ट्रॅकिंग सिस्टिम) बसवली आहे. आणखी ३०० बसमध्ये ही प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे.